# रस्त्यावरील दगड

*ईशा सरदेसाई यांच्याद्वारे पुनर्लिखित*

महाराणी अमानीतोर रस्त्यावरून फेरफटका मारत होत्या, त्यांचे मस्तक गर्वाने आणि आत्मविश्वासाने उंचावलेले होते आणि त्यांचा पोशाख हवेमुळे मागच्या बाजूस सळसळत होता. थोड्याच अंतरावर त्यांच्या स्वकीयांचे म्हणजेच नुबियन लोकांचे उंच आणि थोडेसे झुकलेले असे पिरॅमिडस् होते. आणि त्या पिरॅमिडस्च्या समोरच्या बाजूस होती नाईल नदी. वाळूच्या आणि सोन्याच्या या राज्यामधून ही नदी वाहत होती, वाळवंटी प्रदेशाला जीवनाचा वायदा देत.

फिरता-फिरता महाराणी आपल्या राज्यातील अनेक प्रजाजनांना सामोऱ्या जात पुढे जात होत्या — काही व्यापारी आणि शिल्पकार, शेतकरी आणि इतर शेतमजूरदेखील. महाराणींनी संभाषण न करता हात हलवून किंवा मंदस्मितासह त्यांना अभिवादन केले. अमानीतोर या दूरदृष्टी लाभलेल्या आणि जनतेविषयी अपार अनुकंपा असलेल्या शासक होत्या; अशा प्रकारे फेरफटका मारत असताना त्या लोकमत ऐकून घेताना निरीक्षणही करत असत, त्याचबरोबर आपली प्रजा काय करते आणि आपल्या प्रजेला कशा प्रकारे सर्वोत्तम रितीने मदत करता येईल याकडेही त्या लक्ष देत असत.

थोड्याच वेळात महाराणी गडबड-गोंधळ असलेल्या बाजारपेठेत पोहोचल्या. बाजाराच्या दारातच दोन व्यापारी उभे होते आणि त्यांच्याकडे पाहून असे वाटत होते की, ते एकमेकांशी वादावादी करत आहेत.

“ते *माझे* गिऱ्हाईक होते, जे तू चोरलेस!” त्यातील एक व्यापारी म्हणाला, रागाने त्याचा आवाज चिरकला होता. “ती महिला *माझ्या* दुकानातील दागिने खरेदी करू इच्छित होती!”

“अच्छा!” दुसरा व्यापारी म्हणाला. “*माझ्या* दुकानातील दागिने खरेदी केल्यावर ती *तुझ्याकडील* दागिने विकत घेण्याची इच्छा करेलच कशी?”

त्यांच्यातील वादावादी वाढतच गेली आणि लवकरच एकमेकांकडे बोटे दाखवत ते जोरजोरात आरडाओरड करू लागले. महाराणी काही वेळ त्यांच्याकडे पाहत राहिल्या आणि मग त्यांनी पुढे चालायला सुरुवात केली.

त्यानंतर त्यांना शेतकऱ्यांची एक जोडगोळी भेटली. ते दोघेदेखील आपापसात वाद घालत होते.

"*माझ्या* ठेल्याशेजारी येऊन *तुझे* धान्य विकण्याची तुझी हिंमतच कशी झाली?" त्यांच्यातील एक शेतकरी म्हणत होता.

"हे तू काय बोलतो आहेस? इथे सुरुवातीला मी आलो होतो. *तूच* इथून निघ." दुसरा शेतकरी ओरडत म्हणाला.

दोघांचे भांडण ऐकत असताना महाराणींनी विचार केला, "काहीतरी नक्कीच चुकते आहे इथे."

दुसऱ्या दिवशी त्यांनी आपल्या महालात सेवकांना बोलावून घेतले.

महाराणी त्यांना म्हणाल्या, "माझी अशी इच्छा आहे की, तुम्ही आपल्या राज्यातील सर्वांत मोठा दगड शोधून काढावा आणि काल मी ज्या रस्त्याने फेरफटका मारला त्या रस्त्यावरील सर्वांत जास्त रहदारीच्या ठिकाणी तो दगड ठेवावा."

सेवकांनी होकार दिला आणि लगोलग ते कार्यवाहीसाठी बाहेर पडले. रात्र पडेस्तोवर ते परतले.

ते म्हणाले, "महाराणी, आम्ही काम पूर्ण केले आहे. तो दगड आम्ही रस्त्याच्या बरोबर मध्यभागी ठेवला आहे."

"खूप छान," महाराणी म्हणाल्या. "उद्या सकाळी तुम्ही मला तिथे घेऊन जा."

मग दुसऱ्या दिवशी सकाळी ते महाराणींना रस्त्यावरील त्या भागात घेऊन आले, जो भाग बाजारपेठेच्या अगदी समोरच होता. बाजारपेठेत ज्या कोणाला आपल्या चीजवस्तू विकायच्या किंवा खरेदी करायच्या असतील, तर त्यांना त्याच भागातून जाणे क्रमप्राप्त होते. आता फरक एवढाच होता की, त्यांचा रस्ता एका प्रचंड दगडाने अडवला गेला होता — गुलाबीसर-तपकिरी रंगाच्या मोठ्या ढीगासारख्या एका दगडाने.

"खूपच छान," तो दगड पाहून महाराणी अमानीतोर उद्गारल्या. "चला, आपण जरा सर्वांच्या नजरेआड उभे राहू या — त्या तिथे झाडांच्या मागे — आणि मग काय घडते आहे ते पाहू या."

ते सर्वजण झाडामागे जाऊन उभे राहाताच त्यांना रस्त्यावरून येणारा गोंधळ ऐकू येऊ लागला. तो एक बैलगाडीवाला होता आणि तो सरळ त्या मोठ्या दगडाकडे निघाला होता.

“अरे — हे काय! थांबा! थांबा!” तो माणूस बैलांचे लगाम ओढत ओरडला. ते बैल अडखळत अचानक थांबले, ज्यामुळे बैलगाडीचा चालक हवेत फेकला जाऊन त्यांच्या पाठीवर पडला.

“काऽऽय?” बैलांना बांधायच्या दोरीच्या गुंत्यातून खाली घसरत तो म्हणाला. संकोचून जात दगडाच्या दिशेने त्याने थोडी पावले टाकली. “हा दगड इथे कसा आला?”

तो दगड अचानक तिथे कसा आला हे जाणून घेण्यासाठी तो एकदा दगडाच्या एका बाजूने तर एकदा दुसऱ्या बाजूने फिरून आला. शेवटी त्याने आपले खांदे उडवले, परत आपल्या बैलगाडीत चढला आणि बैलांना दगडाच्या बाजूबाजूने वळवत घेऊन गेला.

झाडांच्या मागून, महाराणींनी हलकेच आपली मान हलवली.

आणखी काही मिनिटे अशीच गेली. तदनंतर, वजनदार आणि मंद गतीने जाणाऱ्या पावलांचा आवाज आला. शिल्पकारांची एक दुक्कल त्या रस्त्याने पायी जात होती आणि ते चीजवस्तूंनी भरलेले एक मोठे पोते वाहून नेत होते.

“नाहीऽऽ!” दगडी शिळेपाशी पोहोचल्यावर त्यातील एकजण म्हणाला. पोत्याच्या जड वजनामुळे त्याला धाप लागली होती. “अरे, तो दगड तर आपल्याच रस्त्यात पडला आहे!”

“हो, पण त्यावर माझा विश्वासच बसत नाही!” त्याचा सहकारी म्हणाला. “इतके सारे जड वजन आपण वाहून आणत इतक्या लांबवर आपण आलो आहोत आणि आपण आता बाजारपेठेत पोहोचतोच आहोत असा जरा कुठे विचार केला, तेवढ्यातच हे घडले!”

मग ते दोघे बराच वेळ अशा रितीने आरडाओरड राहिले. अखेरीस त्यांनी एक दीर्घ श्वास घेतला, आपल्या पोत्याला हाताच्या मुठींनी आवळून धरत दगडाला वळसा घालून ते मार्गस्थ झाले.

महाराणींनी पुन्हा एकदा आपली मान हलवली.

काही वेळातच, आणखी काही लोकांचा समूह त्या ठिकाणी आला. त्या तीन विद्वान व्यक्ती होत्या, ज्या दरबारात मनसबदार होत्या आणि महाराणी त्यांना चांगल्या पद्धतीने ओळखत होत्या. ते तिघेही उच्चशिक्षित होते आणि नीतीशास्त्राची आणि अन्य तत्त्वज्ञानाची जाण असणारे म्हणून संपूर्ण राज्यातील लोक त्यांचा आदर करत असत.

गहन चर्चेमध्ये ते अगदी रममाण झाले होते. कुठल्यातरी नैतिक मुद्द्यावर ते वादविवाद करत असतानाच त्यांच्यातील एकाची नजर समोर गेली आणि त्याच्या दृष्टीस तो दगड पडला. इतरांना हाताने अडवत तो एकदम थांबला.

“ते पाहा — ते काय आहे पाहा!” तो म्हणाला. “एक मोठा दगड. रस्त्याच्या बरोबर मध्यातच ठेवला आहे. हे असे कोणी केले असेल?”

त्या मोठ्या दगडाकडे त्याच्या सहकाऱ्यांनीदेखील तितक्याच आश्चर्याने पाहिले.

त्यांच्यातील एक अखेरीस म्हणाला, “दगडकाम करणाऱ्यांपैकीच कोणाचे तरी हे काम असणार,” त्याच्या भुवया नापसंतीने वक्र झाल्या होत्या. “ते लोक नेहमी त्यांचे काम करत असताना असाच गोंधळ घालतात.”

“ते दगडकाम करणारे कारागीर!” तिसरा माणूस हवेत हातवारे करत म्हणाला. आता दगडकाम करणारे कारागीर हा त्यांच्या चर्चेचा या विषय होऊन बसला, तेव्हा त्या कारागीरांना शाब्दिक मार देणे तर अगदी सोपे होते.

“मला माहीत आहे ती त्यांची खोडच आहे, आपली हत्यारे कुठेही टाकून देण्याची आणि मग कोणी येऊन त्यावर धडपडू शकते याची काळजीही ते करत नाहीत,” त्या माणसाने आपले बोलणे चालूच ठेवले. “पण हे असे? प्रत्यक्ष एक *दगडच* रस्त्यातच टाकायचा? आणि तोदेखील इतका मोठा. किती असमंजसपणा आहे हा! किती भयंकर आहे हे! किती तत्त्वशून्य वागणे! किती निंदनीय गोष्ट आहे ही!”

त्याची ही निंदनीय शब्दांची यादी वाढतच गेली, ते शब्द अधिकाधिक क्लिष्ट होऊ लागले; तसतसे बाकीचे दोघे जास्त जोमदारपणे होकार भरू लागले. *होय, होय,* त्यांनी विचार केला. *किती भयानक आहे हे. दगडकाम करणारे कामगार किती चूकीचे वागले आहेत!*

दगडकाम करणाऱ्या कामगारांना दूषणे देत ते तिघेदेखील त्या दगडाला वळसा घालून पुढे मार्गस्थ झाले.

तिकडे झाडामागे, महाराणींचा एक सेवक त्यांच्याकडे वळला आणि म्हणाला, “महाराणी, तुमची आज्ञा असल्यास मी हे विचारू इच्छितो की, आपण इथे काय पाहत आहोत? इथे काय घडेल अशी तुमची अपेक्षा आहे.”

“थोडी वाट पाहा. कळेलच तुला ते.” महाराणी शांतपणे म्हणाल्या.

त्या असे बोलत असतानाच एक माणूस, एक विनम्र शेतकरी, त्या रस्त्याने चालत आला. त्याच्या खांद्यावर एक छोटीशी झोळी अडकवलेली होती.

त्या मोठ्या दगडापाशी आल्यावर तो थांबला.

"हा दगड बाजाराला जाणाऱ्या रस्त्याला तर अडथळा ठरतो आहे." तो स्वतःशीच पुटपुटला. "दगडाला वळसा घालून जायला लागल्यामुळे लोकांना किती त्रास होईल."

असे म्हणून त्याने आपली झोळी खाली ठेवली व तो त्या दगडाकडे चालत गेला. आणि आपले पाय जमिनीत घट्ट रोवून तो त्या दगडाला ढकलू लागला.

अअऽऽऽ. . . तो दगड थोडादेखील हलला नाही.

अअऽऽऽ. . . तरीदेखील काही नाही.

अअऽऽऽ. . . आता या वेळी त्याला किंचित फरक वाटला, खालच्या जमिनीपासून तो दगड त्याला जरासा हलल्यासारखा वाटला. त्याने खाली पाहिले आणि त्याला दिसले की, तो दगड किंचितसा सरकला आहे.

अअऽऽऽ. . . ते तर अतिशय कष्टदायक काम होते, पण तो दगड आता थोडासा तरी हलला होता, ज्यामुळे त्याला हळूहळू पुढे ढकलणे आता किंचितसे सुसह्य वाटत होते.

तो त्याचे हे काम करत राहिला; रस्त्यावर आणखी काही लोक गोळा झाले. त्याला पाहिल्यावर ते तिथेच थबकले; त्यांना त्याची दया येत होती — हा छोटासा, सडपातळ मनुष्य आपल्या संपूर्ण ताकदीनिशी त्या दगडाला ढकलण्याचा प्रयत्न करतो आहे.

आणि मग — त्या बघ्या लोकांपैकी एकजण पुढे सरसावला. त्यानेही आपले पाय जमिनीवर रोवले. त्यानेही आपले हात दगडाच्या त्या खडबडीत पृष्ठभागावर दाबले आणि ढकलावयास सुरुवात केली. त्यानंतर आणखी एक माणूस आला आणि मग अजून एक आणि मग अन्य एक असे करत तिथे दगडासमोर माणसांची गर्दी झाली. त्या सर्वांनी एकत्रितपणे आपले हात त्या दगडावर रोवले आणि एकत्र येत त्याला ढकलले. हे कार्य करत असताना त्यांच्यातील प्रत्येकाला आपले हृदय विशाल होत असल्याचे जाणवत होते. मृदुलपणाची काहीतरी संवेदना ते अनुभवत होते. शेतकऱ्याच्या व्यक्तिमत्वातील औदार्याने प्रभावित होत, त्यांनादेखील परोपकारातून मिळणाऱ्या चांगुलपणाचा अनुभव आला. शेतकऱ्याची खंबीरता, तसेच नेमून दिलेले कार्य संपेस्तोवर पुढे जात राहण्याच्या त्याच्या

दृढनिश्चयाने प्रेरित होऊन त्यांनीही आपले प्रयत्न दुप्पटीने वाढविले. पुन्हापुन्हा ते ढकलतच राहिले. त्यांच्या माध्यमातून, त्यांच्या सभोवतालातून, त्यांच्या अंतरातून शक्तिचा संचार होत होता. तो दगड ज्याला हलवणे यापूर्वी अशक्यप्राय भासत होते, आता तो जमिनीवर सहजतेने घसरत होता. लवकरच तो पूर्णपणे रस्त्यावरून बाजूला हटला.

ज्या लोकांनी शेतकऱ्याची मदत केली होती, ते सर्व दाटीवाटीने त्याच्याभोवती जमले. त्या लोकांनी त्याच्या पाठीवर शाबासकीची थाप दिली आणि प्रेमाने त्याला आलिंगन दिले. आणि मग, झगमगत्या सूर्यकिरणांनी आच्छादित होऊन ते बाजारात एकत्रितपणे पायी चालत निघाले.

महाराणी झाडामागून बाहेर आल्या. त्यांच्या चेहेऱ्यावर स्मितहास्य पसरले होते.

“किती सुंदर दिवस आहे नाही आजचा?” त्या त्यांच्या सेवकांना म्हणाल्या. “पायी चालण्यासाठी उत्तम दिवस.”

© २०१९ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

ही कथा एका लोककथेने प्रेरित आहे आणि विश्वभरातील अनेक परंपरांमध्ये सांगितली गेली आहे.